# स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण आयोजित
# पर्यटन सप्ताह 27 सप्टेंबर ते 3 ऑक्टोबर २०२१

महोदय,

प्रथम पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाल्यापासून सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पर्यटन व्यवसाय उत्तमरीत्या आकाराला आला आहे. उद्योग आणि शिक्षण संस्था यांचा मेळ साधून जिल्ह्यातील पर्यटन उद्योग वाढीस लागावा, त्यामध्ये धोरणात्मक योगदान देता यावे, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा आणि त्यांना अधिकाधिक रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात, तसेच विद्यार्थी आणि समाजामध्ये पर्यटन व्यवसायाविषयी आणि शाश्वत, जबाबदार पर्यटनाविषयी जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या वतीने जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून 'पर्यटन सप्ताह' आयोजित केला आहे. हा पर्यटन सप्ताह दिनांक 27 सप्टेंबर ते 3 ऑक्टोबर २०२१ या कालावधी मध्ये संपन्न होणार आहे. या सप्ताहात महाविद्यालयातील सर्व विभागांच्या वतीने विविध अभिनव कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या **पर्यटन सप्ताहाचा उद्घाटन सोहळा दिनांक 27 सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ठीक १० वाजता महाविद्यालयातील नरहरी झांट्ये सभागृहात संपन्न होणार आहे. तरी या सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.**

या सप्ताहात **दिनांक २८ सप्टेंबर २०२१ रोजी सिंधुदुर्ग किल्ला स्वच्छता अभियानाचे आयोजन केले आहे. या अभियानामध्ये देखील आपण सहभागी व्हावे ही विनंती. आपण व आपल्या संस्था/संघटना सदस्यांनी सकाळी नऊ वाजता मालवण धक्का येथे उपस्थित राहावे.** तेथून होडी वाहतुकीची सोय करण्यात आलेली आहे.

त्याच बरोबरीने इतर सर्व कार्यक्रमांची यादी सोबत देत आहोत. त्या कार्यक्रमांमध्ये आपण सर्वांनी सोयीनुसार ऑनलाईन अथवा ऑफलाईन जरूर सहभाग घ्यावा, ही विनंती. कोविड संबंधित सर्व नियमांचे पालन करून कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल.

धन्यवाद.

प्राचार्या डॉ. उज्ज्वला सामंत

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण

# S. K. Patil Sindhudurg Mahavidyalaya, Malvan

## Tourism Week 2021 Schedule

| Date | Event | Department |
|---|---|---|
| 27/09/2021 Monday | **Inauguration** | IQAC, Gymkhana |
| 27/09/2021 Monday | **Essay Competition** | NSS |
| 28/09/2021 Tuesday | **Fort Sindhudurg Cleanliness Drive** | NCC, Department of Economics, NGOs |
| 29/09/2021 Wednesday | **Rangoli Competition** | Department of Hindi & Geography |
| 30/09/2021 Thursday | **Online Quiz Competition on Sindhudurg Tourism** | Career Guidance & Placement Cell and Library |
| 01/10/2021 Friday | **National Webinar on 'Innovative Practices in Tourism'** | IQAC, Department of Commerce & Accountancy, Economics |
| 02/10/2021 Saturday | **Visit to Fort Nivati** | DLLE and Department of Marathi |
| 03/10/2021 Sunday | **Expert Talk on Tourism, Valedictory Ceremony** | Department of Geography and Hindi, IQAC |